# देशभरातून सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे म्हणून देगलूरचे पोलीस निरीक्षक भगवान धबडगे यांचा गौरव

गोदातीर दि 11/07/2023



**नांदेड(प्रल्हाद कांबळे)**– गुन्हे अन्वेषण व कायदा व सुव्यवस्था राखण्यात सन २०२१ मध्ये देशभरातून सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे म्हणून नांदेड जिल्ह्यातील देगलूर पोलीस ठाण्याची निवड करण्यात आली होती. या ठाण्याचे तत्कालीन प्रमुख पोलीस निरीक्षक भगवान धबडगे यांचा सोमवारी दि. १० रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईतील एका कार्यक्रमात गौरव करण्यात आला आहे.

दरवर्षी कायदा व सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध, दोषसिध्दी यामध्ये सुधारणा व्हावी यासाठी देशपातळीवर १० सर्वोत्कृष्ट पोलीस ठाण्यांची केंद्रीय गृह मंत्रालयाकडून निवड होत असते. राज्यातील पोलीस ठाण्यांची कार्यक्षमता आणि काम गिरी वाढविणे, गुणवत्ता वाढविणे, दिलेल्या मर्यादिमध्ये उत्कृष्ट पध्दतीने काम करणे, तसेच गुन्हेगारीला प्रतिबंध आणि गुन्ह्याचा तपास आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने संबंधित पोलीस अधिकारी, अंमलदार यांना प्रोत्साहित करणे, इत्यादी हेतु साध्य करण्यासाठी सन २०२० या वर्षांपासून राज्य पातळीवर सर्वोत्कृष्ट पाच पोलीस ठाण्यांची निवड करुन सदर पोलीस ठाण्यांना सन्मानचिन्ह व रोख बक्षिस प्रदान करण्यात येत आहेत.

त्याच धर्तीवर सन २०२१ या वर्षातील कार्य मुल्यांकनाच्या बाबतीत देश पातळीवर सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे स्पर्धेत नांदेड जिल्ह्यातील देगलूर पोलीस ठाण्याची निवड झाली. तत्कालीन पोलीस निरीक्षक भगवान धबडगे, उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन सांगळे यांनी पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, .अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली देगलूर पोलीस ठाण्याची इमारत व एकंदरीत येथील सीसीटीएनएस व कामकाज हे अतिशय उल्लेखनीय केल्याने देगलूर पोलीस ठाण्याचा क्रमांक देश पातळीवर आला. यामुळे तत्कालीन पोलीस निरीक्षक भगवान धबडगे यांचा मुंबई पोलीस मुख्यालयात सोमवार दि. १० जुलै रोजी आयोजित सन्मान सोहळ्यात गौरव करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्यासह जिल्ह्यातील सर्वच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पोलीस निरीक्षक धबडगे यांचे अभिनंदन केले आहे.

# शाळेसोबतच घरंही संस्काराचं केंद्र व्हावं –पो.नि.भंडरवार

गोदातीर दि 11/07/2023



**नवीन नांदेड**–मोबाईल मुळे घरातील संवाद संपला. खेळ संपले. मोबाईलवर ...को ते पाहून भावी पिढी गुन्हेगारीकडे ...त आहे. त्यातूनच मुलींवर अत्याचार ...त आहेत. हे रोखणे आपल्याच हातात ...हे. त्यासाठी पालकांनी पुढाकार घेण्याची ...ज आहे. त्यासाठी शाळेसोबतच प्रत्येक ...ही संस्काराचे केंद्र झाले पाहिजे, असे मत नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांनी केले.

सिडको संभाजी चौकातील कुसुमताई विद्यालयात शनिवारी पालक सभा घेण्यात आली. त्यावेळी पालकांशी संवाद साधतांना भंडरवार बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, अगोदरचे विद्यार्थी संस्कारक्षम व शिस्तप्रिय होते. वडिलधारी व शिक्षकांचा मानसन्मान करायचे. त्यांच्यामध्ये आदरयुक्त भीती असायची. आताची पिढी मात्र हे सर्व सोडून रात्रंदिन मोबाइल कडे वळली आहे. संस्कार, शिस्त लोप पावत चालली आहे. आता शाळेबरोबर घरही संस्काराचं केंद्र बनलं पाहिजे आणि पालक पहिल्यांदा शिक्षक बनला पाहिजे. मुले आपलेच अनुकरण करत असतात. त्यामुळे पालकांनी स्वत: जबाबदारीने वागले पाहिजे, असे आवाहनही भंडरवार यांनी पालकांना केले. या पालक सभेला संस्थेचे सचिव संभाजीराव बिरादार, सहसचिव शशिकला बिरादार, मुख्याध्यापक कमलाकर जोशी, पर्यवेक्षिका उज्वला सावते, शेख निजाम गवंडगावकर, पालक प्रतिनीधी गोवींद टरके, दिगंबर शिंदे आदी पालक उपस्थित होते.

याप्रसंगी जोशी, शेख, देशमुख जाधव, टरके पाटील यांनी भाषण करून पालकांचे प्रबोधन केले. संस्थेचे सचिव संभाजीराव बिरादार यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. सौ. वंदना सोनाळे यांनी सूत्रसंचालन केले. विश्वास हंबर्डे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सामुहिकपणे राष्ट्रगीत गाऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.